**पाहिजेत !!** राजेंद्र कुमार : ९४२२६७५१६४

एखादे कुटुंब हवे आहे, जे शेती काम करतील. माझ्या घरातील व शेतीवरील कामात caretaker म्हणून काम पाहतील.

**प्रथम पगार रुपये ८,०००/- ते रुपये १५,०००/- प्रतिमाह**

**एका मुलाचा शालेय शिक्षण खर्च समाविष्ट**

गाईचा गोठा सर्व कामे : दूध काढणे, चारा देणे, गोठ्यात इतर कामे...

शेतीवरील काम : शेतीवरील कामात लक्ष देणे, पाणी पंप सुरू करणे व शेताला पाणी पुरवठा करणे, माणसे काम करतील ते पाहणे व ईतर काही कामे.

**राहण्याची सोय आहे... ५ वर्षे करार असेल...**

**गाव : लोणविरे तालुका : सांगोला जिल्हा : सोलापूर**

दैनिक

अचूक वेध,अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

**वर्ष : ०४**, अंक : ३५६

पाने : ०४, किंमत : ०३ रुपये

संपादक : विनोद कैलास गोरे

RNI NO. : MAHMAR/2022/82056

Follow Us On : www.aksharaj.in

Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, बुधवार, दि.०६ ऑगस्ट २०२५

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा...

**अक्षराज : संजय पंडीत**

**दि.०५, मुंबई :** राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुका या नवीन प्रभाग रचनेनुसार आणि ओबीसी आरक्षणासाह घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने हिरवा कंदील दाखवला आहे. यासंबंधी नवीन प्रभाग रचनेला आव्हान देणाऱ्या याचिका सर्वोच्च न्यायाल्याने फेटाळल्या आहेत.

वार्ड किंवा प्रभाग रचना हा पूर्णपणे राज्य सरकारचा अधिकार असल्याच सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. या संबंधी दोन याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्या आहेत. त्यामुळे राज्य सरकारने आदेश दिल्यानुसार नवीन प्रभाग रचनेनुसारच राज्यातील निवडणुका होणार आहेत. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका या मे २०२१ पासुन राखडल्या आहेत. ओबीसी आरक्षणसंबंधी एक याचिका दाखल करण्यात आली होती. त्यामुळेच या सर्व निवडणुका रखडल्या होत्या. त्यावर निर्णय देत या निवडणुका ओबीसी आरक्षनानुसारच घेण्यात याव्यात असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. त्यानुसार नवीन प्रभाग रचनेचे आदेश राज्य सरकारने दिले होते.

गेल्या महिन्यात ६ मे रोजी सर्वोच्च न्यायालयाने या संबंधित निर्देश देऊन राज्य सरकारला निवडणुका घेण्याचे आदेश दिले होते.प्रभाग रचना करण्याचा अधिकार हा पूर्णपणे राज्य सरकारचा असल्याचे त्यावेळी न्यायालयाने सांगितले होते.त्यानुसार राज्य सरकारने नवीन प्रभाग रचनेचे आदेशही दिले होते. परंतु लातूर जिल्ह्यातील औसा नगरपालिकेसंबंधी एक हस्तक्षेप याचिका दाखल करण्यात आली होती. त्यामध्ये नवीन प्रभाग रचनेवर आक्षेप घेण्यात आला होता.

### ओबीसी आरक्षणासाह निवडणुका होणार!




दरम्यान आता सर्वोच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली आहे. या आधी दोन महिन्यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला ओबीसी आरक्षणावरून काही निर्देश दिले होते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत चार आठवड्यात नोटिफिकेशन काढा आणि चार महिन्याच्या आत निवडणुका घ्या असं न्यायालयाने स्पष्ट म्हटलं होतं. १९९४ ते २०२२ पर्यंत जी ओबीसी आरक्षणाची स्थिती होती, त्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्या असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. राज्य सरकारला आणि निवडणूक आयोगाला दिलेल्या कार्यकाळात कार्यवाही करावी असेही सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं होतं. सन २०२२ मध्ये जी प्रभागरचना झाली होती. तो कायदा आता रद्द करण्यात आला आहे. तर २०१७ च्या पूर्वरचनेनुसार आता या सर्व निवडणुका होणार आहेत.

## बेलापूर धारण तलाव परिसरात देशी वृक्षरोपांची लागवड



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०५, नवी मुंबई :** शहरातील वृक्षसंपदेत भर घालावी यादृष्टीने महाराष्ट्र शासनाच्या अमृत वृक्ष लागवड व माझी वसुंधरा अभियान ६.० अंतर्गत बेलापूर विभागात सेक्टर ८ धारण तलाव परिसरात देशी झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. यावर्षी महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार नवी मुंबईच्या जैवविविधेत वाढ होण्याकरिता पशूपक्ष्यांचा अधिवास राहील अशा देशी वृक्षरोपांची लागवड करण्यात येत आहे.

अशाच प्रकारे जांभूळ, बकुळ, पेरू, सीताफळ, काजू अशा २५ नग फळवृक्षांची लागवड बेलापूर विभागात सेक्टर ८ धारण तलाव परिसरात उद्यान विभागाचे परिमंडळ १ उपआयुक्त किसनराव पलांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आली. यामध्ये अनुलोम या स्वयंसेवी संस्थेचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## सततचा त्रास असह्य, तृतीय पंथीयाने आयुष्य संपवलं

**दि.०५, भिवंडी :** रिक्षा चालक असलेल्या प्रियकराच्या शारीरिक आणि मानसिक त्रासाला कंटाळून एका २३ वर्षीय तृतीय पंथीयाने आपल्या आयुष्याची अखेर केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. भिवंडी येथे ही घटना घडल्याची माहिती असून तुषार कालीदास लौंडे उर्फ त्रिशा केणे (वय २३) असं आयुष्य संपवलेल्या तृतीय पंथीयाचे नाव असल्याची माहिती आहे. या घटनेने भिवंड परिसरात एकच खळबळ माजली असून प्रियकर रिक्षा चालकाला अटक करण्यात आल्याची माहिती आहे.

प्रियकर रिक्षा चालकाला अटक

या प्रकरणी मृत त्रिशा केणेच्या भावाच्या फिर्यादीवरून भोईवाडा पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून प्रियकरा विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी या प्रियकर रिक्षा चालकाला अटक केली आहे. अतीक मोहम्मद फारूख अंसारी (२७ रा. भिवंडी) असे अटक केलेल्या प्रियकराचं नाव आहे.

या घटनेबाबत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मृतक तुषार उर्फ त्रिशा केणे भिवंडी शहरातील धामणकर नाका परिसरात त्यांच्या समुहासोबत राहत होते. तर आरोपी रिक्षा चालक अतिक हा भिवंडी शहरातील समानगर परिसरात राहतो. या दोघांमध्ये काही महिन्यापासून प्रेमसंबंध निर्माण झाले होते. याच प्रेमसंबंधातून अतिक हा मृतक त्रिशाला शारीरिक, मानसिक जाचासह वारंवार मोबाईल फोनद्वारे त्रास देत होता. यामुळे त्रिशा कंटाळली होती. अखेर या त्रासातून मुक्त होण्यासाठी तिने टोकाचं पाऊल उचललं. प्रियकर रिक्षा चालकाच्या जाचाला कंटाळून अखेर त्रिशाने १ ऑगस्ट रोजी सायंकाळी आठ वाजताच्या सुमारास आपल्या आयुष्याची अखेर केली आहे. याप्रकरणी त्रिशाचा भाऊ याच्या फिर्यादीवरून रिक्षा चालक अतिक विरोधात त्रिशाला जीव देण्यास प्रवृत्त केल्याबाबत कलम १०८ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला २ ऑगस्ट रोजी अटक करण्यात आली आहे. सध्या पोलिस याप्रकरणी तपास करत आहेत.

## शिवशंभूच्या भक्तीत निघालेली कावडयात्रा, एकच गोंधळ उडाला

**दि.०५, बुलढाणा :** श्रावण मासाचा दुसरा सोमवार आहे. अनेक ठिकाणी भाविक हे शिवशंकर शंभोच्या जयघोषात आपल्या परिसरातील शिव मंदिरात रात्रीपासूनच विविध मार्गाने दाखल होत असतात. मात्र आज बुलढाण्यातील अजिंठा मार्गावरील पाडळी आणि पळसखेडच्या मध्ये एक भरधाव मोटरसायकलने कावडदाऱ्यांना धडक दिली. सुमारे रात्री तीन ते साडेतीन वाजेच्या सुमारास ही घटना घडली आहे.

या अपघातामध्ये एक जण जागीच ठार तर तीन जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती येत आहे. मृतकाचे नाव मुकेश गजानन राठोड (वय वर्ष २५) असून तो करवंड येथील रहिवासी आहे. कावड यात्रेतील आणखी दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत. तर दुचाकीवरील दोघांनाही जबर मार लागला आहे. काल सायंकाळी सात वाजेच्या सुमारास गुळ भेली येथून पहिल्यांदाच बुद्धनेश्वरला कावड यात्रा निघाली. जवळपास ४० पेक्षा अधिक तरुण या कावड यातील सहभागी झाले होते. बुद्धनेश्वरला पोहोचल्यानंतर रात्री बारा वाजेच्या सुमारास आरती करण्यात आली. त्यानंतर श्रावण सोमवार सुरू झाल्यामुळे कावड यात्रा परतीसाठी रवाना झाली. दरम्यान पळसखेड नागोच्या जवळपास एका भरधाव मोटर सायकल मागून येऊन कावड यात्रा मध्ये घुसली. मोटरसायकल क्रमांक एम एच २८ बी झेड ५२ ७४ ने कावडदारी मुकेश राठोडला धडक दिली.

दरम्यान, योगेश चव्हाण आणि आणखी एक कावडधारी या धडकेत जखमी झाले. मोटर सायकल स्वार ऋषिकेश काकडे आणि मनोज माळोदे हे दोघेही जबरदस्त जखमी झाले आहेत. सर्वांना तात्काळ जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु मुकेश राठोड यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला होता. दोन्हीही मोटर सायकलस्वार बुलढाणा येथील रहिवासी आहेत. अपघातात ठार झालेला मुकेश राठोड यांना दोन मुले आहेत. त्यांच्या मृत्यूने करवंड आणि गूळभेली वासियांवर शोककाळा पसरली आहे.

## चिमूर-चंद्रपूर एसटी बसचा भीषण अपघात एक ठार, १९ प्रवासी जखमी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, वरोरा (चंद्रपूर) :** चिमूरहून- चंद्रपूरकडे जाणाऱ्या राज्य परिवहन मंडळाच्या बसला आज दुपारी भीषण अपघात झाला. चारगाव (खुर्द) जवळील एका वळणावर ही बस रस्त्याच्या खाली उतरली. या अपघातात बसचा वाहक सुरेश भटारकर (रा. राजुरा) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. तर बसमधील चालक व इतर १९ प्रवासी जखमी झाले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



आज, मंगळवार (५ ऑगस्ट) रोजी दुपारी दोन वाजता चिमूर आगाराची बस क्र. एमएच- ४० ए.क्यू ६१८१ चिमूरवरुन चंद्रपूरच्या दिशेने जात होती. चंद्रपूर–वरोरा राष्ट्रीय महामार्गावर चारगाव (खुर्द) गावाजवळ एका वळणावर समोरुन भरधाव वेगात आलेल्या ट्रॅव्हल्समुळे बसचालक सुनिल सुधाकर कुसनाके (वय ३७, रा. वरोडा) यांचे बसवरील नियंत्रण सुटले. नियंत्रण सुटल्याने बसचे स्टेरिंग लॉक झाले आणि बस रस्त्याच्या खाली घसरली.

अपघाताच्या वेळी बसमध्ये सुमारे २५ प्रवासी होते. यापैकी ६ प्रवासी गंभीर जखमी झाले असून त्यांना पुढील उपचारासाठी चंद्रपूर येथील सार्वडनिक रुग्णालयात दाखल करण्यात आले. गंभीर जखमींमध्ये शकील शेख (आडेगाव), शाहीन शेख( गडचांदूर), वासुदेव शेडमाके( वायगाव भोयर), वसंता देठे(बल्लारशा), ईश्वर चिंचोळकर( धामणी), आणि संजय कोवे(घुग्घूस) यांचा समावेश आहे.

इतर जखमी प्रवाशांवर वरोरा येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत. या जखमींमध्ये रेखा श्रीरामे( चंद्रपूर), सुमन बालुदे( लोधीखेडा), कांताबाई नवले(भिसी), शामकला दडमल (सुमठाणा), भरत चिंचोलकर (चिमूर), वनिता दडमल (चिमूर), मधुकर चिंचोलकर (चिमूर), मालती कापसे (चिमूर), सोमाबाई चिंचोलकर (धामणी), स्नेहा वाजुरकर (इंदिरानगर चंद्रपूर), आणि सदाशिव मून (बल्लारशा) यांचा समावेश आहे.

अपघाताची माहिती मिळताच राज्य परिवहन मंडळाचे वरोरा आगार प्रमुख वर्धेकर यांनी घटनास्थळी धाव घेतली आणि पंचनामा सुरु केला. बसचालकाने स्वत: शेगाव पोलीस ठाण्यात जाऊन अपघाताची माहिती दिली. शेगाव पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## डोंबिवलीच्या तरुण मुलामुलींनी गाजविली दोरीच्या उड्यांची जागतिक जम्प रोप स्पर्धा

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०५, डोंबिवली (ठाणे) :** जपानच्या कावासाकी शहरात जागतिक जम्प रोप ( दोरी उड्या ) चॅम्पियन स्पर्धेत डोंबिवलीच्या तरुण मुलामुलींनी पुन्हा एकदा चमकदार कामगिरी करून दाखविली आहे. २७ जुलै ते ३ ऑगस्ट २०२५ या दरम्यान झालेल्या स्पर्धेत महाराष्ट्राच्या टीमने दोन सुवर्ण ८ रौप्य आणि सहा कांस्य अशी एकूण १६ पदकांची कमाई केली असून त्यात बहुतेक खेळाडू हे डोंबिवलीकर होते. हे विशेष. या जागतिक चॅम्पियन स्पर्धेत ३६ देशातील २६०० खेळाडूंनी भाग घेतला होता. विशेष म्हणजे याच खेळाडूंनी जुलै २०२३ मध्ये अमेरिकेत झालेल्या जागतिक जम्प रोप चॅम्पियन स्पर्धेत आणि जुलै २०२४ जपान मध्ये एशियन स्पर्धेत अशीच पदके मिळवली होती. कोणताही सरकारी निधी, खाजगी प्रायोजक न घेता, स्वताच्या खर्चाने या टीमने ही कौतुकास्पद कामगिरी केली आहे. त्यामुळे पुढे अशीच कामगिरी करण्यासाठी त्यांना आर्थिक मदतीची गरज आहे. लोकप्रतिनिधी, सरकारी निधी व खाजगी प्रायोजक यांच्याकडून काही निधी मिळाल्यास या खेळासाठी अनेक नामवंत खेळाडू देशासाठी तयार होतील अशी अपेक्षा प्रशिक्षक अमन वर्मा यांनी व्यक्त केली आहे.



भूमिका नेमाडे एक सुवर्ण, एशान पुथ्रन एक सुवर्ण व एक रौप्य, तन्वी नेमाडे दोन रौप्य व एक कांस्य, नमन गंगवाल (नाशिक) दोन रौप्य व एक कांस्य, अमन वर्मा एक रौप्य व एक कांस्य, मानस मुंगी एक रौप्य व एक कांस्य, रोनक साळवे एक रौप्य, पारोल झंकार एक कांस्य, पद्माशी मोकाशी एक कांस्य अशी एकूण १६ पदके जिंकली आहेत. वय १६-१८ आणि १९ + अशा वर्गवारीत एकेरी, दुहेरी, तिहेरी, मिश्र यामध्ये उपरोक्त पदके या तरुणांनी जिंकली आहेत.

या टिमचे प्रशिक्षक अमन वर्मा यांनी गेले काही वर्षे डोंबिवलीतील विद्यार्थ्यांना शाळा व कॉलेज मध्ये जावुन याचे खास प्रशिक्षण देत आहेत व यासाठी अथक परिश्रम त्यांनी घेतले आहेत.

या विजयी टीमचे आज सोमवारी/मंगळवारी मध्यरात्री मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर आगमन होत असून त्यांच्या स्वागतासाठी अनेकजण उपस्थित राहणार आहेत. या टिमसाठी खूप खूप अभिनंदन !

## संपादकीय

### सावधानता हेच धोरण !

नयनरम्य निळ्याशार रंगाचा लोभसवाणा समुद्र, त्या निळ्या पाण्यात फिरणारे रंगीबेरंगी इवले इवले मासे, लांबपर्यंत चालता येईल असा स्वच्छ किनारा आदी गोष्टींमुळे जगभरातील पर्यटकांना मालदीवचे आकर्षण असते. या मालदीवचे स्थान भारताच्या लक्षद्वीप बेटांजवळ आणि आंतरराष्ट्रीय जहाज मार्गाजवळ असल्याने तो देश भारतासाठी सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मालदीव दौरा नुकताच झाला. या दौऱ्यानंतर एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहिला आहे – मालदीव आता भारतासाठी खरेच विश्वासार्ह भागीदार ठरू शकतो का? भौगोलिक जवळीक, सांस्कृतिक जुळवाजुळव आणि अनेक दशकांची मैत्री असतानाही आज मालदीवच्या राजकीय आणि धोरणात्मक उतार–चढावांमुळे हा संबंध नव्याने तपासण्याची गरज भासते आहे. मालदीवची सुरुवातीची वसाहत भारतीय उपखंडातील आणि श्रीलंकेतील द्रविडीय समद्रमार्गिक लोकांनी केली होती. या स्थलांतरामुळे तेथे आरंभी हिंदू आणि नंतर बौद्ध संस्कृती पसरली. कालांतराने ११५३मध्ये इस्लाम धर्माचा स्वीकार झाल्यानंतर या देशाला एक नवीन ओळख मिळाली. हिंद महासागरातील एक लहान, परंतु धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचा असा हा देश आहे. सुमारे १,१९२ प्रवाळ बेटे असलेल्या या देशात २६ अटॉल आहेत, ज्यापैकी फक्त २०० बेटांवर लोकवस्ती आहे. १९६५मध्ये मालदीवला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्यास मान्यता देणाऱ्या देशांत भारत पहिला होता. या घटनेने दोन देशांच्या दरम्यान मैत्रीचा पाया रचला गेला. सन १९८८मध्ये मालदीवच्या सुरक्षेसाठी भारताने ‘ऑपरेशन कॅक्टस’ अंतर्गत लष्करी हस्तक्षेप करून राष्ट्रपती मौमून अब्दुल गयूम यांना वाचवले. या निर्णायक हस्तक्षेपामुळे दोन्ही देशांमधील विश्वास आणि सहकार्य वाढीला लागले. तसे पाहिले तर भारताने मालदीवला मदतीचा आणि संरक्षणाचा अव्याहत ओघ सन १९६५पासून – मधल्या एक–दोन वर्षांचा अपवाद वगळता – आजतागायत सुरू ठेवला आहे. त्या देशातील पायाभूत सुविधांचा विकास, अन्नधान्य, संरक्षण विषयक सामुग्री, आर्थिक मदत यांसाठी भारताने अनेकदा पुढाकार घेतला. सन २००४मधील त्सुनामी आणि करोना साथीच्या काळातदेखील भारताने मालदीवला प्रचंड प्रमाणात मदत केली होती. त्यात वैद्यकीय आणि आर्थिक अशा दोन्हींचा समावेश होता. एकंदरीत या देशाला जणू भारताने फुकट खिरापतच वाटली; पण त्याचे सोने झाले नाही. कट्टरता अणि चीनसारख्या देशांचा प्रभाव, आर्थिक लालसा यामुळे या देशाची अवस्था समुद्रातील बिन शिडाच्या जहाजासारखी झाली आहे. सतत दुसऱ्याच्या जिवावर अवलंबून राहायचे अणि एक दिवस त्याच्याच जिवावर उठायचे, अशी वृत्ती असणारा हा देश आहे.

मालदीवचे रूपडे कालपरत्वे बदलत गेले. सन २०१३ ते २०१८ या काळात राष्ट्राध्यक्ष अब्दुल्ला यामीन यांच्या कारकिर्दीत मालदीवने चीनच्या ‘बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह’ अंतर्गत मोठ्या प्रमाणात गुंतवणूक स्वीकारण्यास सुरुवात केली. ‘चीन–मालदीव मैत्री पूल’सारख्या प्रकल्पांनी चीनचा त्या देशातील प्रभाव वाढू लागला. त्यातून पुढे मालदीव कर्जाच्या विळख्यात अडकण्याची शक्यता निर्माण झाली. काही विश्लेषकांचे असे मत आहे, की या प्रकल्पांच्या माध्यमातून मालदीवच्या आर्थिक स्वातंत्र्यावरदेखील दबाव निर्माण झाला आहे. सन २०१८–२०२३च्या कार्यकाळात इब्राहीम सोलिह यांच्या नेतृत्वाखालील सरकारने पुन्हा भारताकडे कल दाखवला. पण स्वार्थी मालदीवला केवळ चीनसोबतच नाही तर पाकिस्तान, सौदी अरेबिया आणि यूएईसारख्या देशांसोबतही जवळीक वाढवायची होती. ज्याच्याकडे जे मिळेल ते घ्यायचे, हात पसरायचे ही वृत्ती.

# युवा खेळाडूंची जबरदस्त कामगिरी

**इंग्लंड दौऱ्यावर असलेल्या भारतच्या युवा संघाने ५ कसोटी सामन्यांची मालिका २ – २ अशी बरोबरीत सोडवून इतिहास रचला.**



सोमवारी पाचव्या कसोटीच्या पाचव्या दिवसाचा खेळ सुरू झाला तेव्हा भारतीय संघ इंग्लंडचे उरलेले चार फलंदाज बाद करून ही कसोटी जिंकेल असा विचारही कोणी केला नसेल कारण इंग्लंडला जिंकायला फक्त ३६ धावा हव्या होत्या. इंग्लंडचे उरलेले फलंदाज या धावा सहज करतील आणि मालिका ३ – १ ने जिंकतील असाच सर्वांचा होरा होता. मात्र भारतीय खेळाडूंच्या मनात काहीही करून ही कसोटी जिंकायचीच आणि मालिका बरोबरीत सोडवायची असा विश्वास होता आणि या विश्वासाच्या जोरावरच भारताने ही कसोटी अवघ्या सहा धावांनी जिंकली आणि सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला. भारताचा हा विजय म्हणजे चमत्कारच म्हणावा लागेल अर्थात चमत्कार करण्याची देखील कला असावी लागते ही कला भारतीय खेळाडूंनी साध्य केली आणि साहेबांना त्यांच्या देशातच लोळविले. ही मालिका बरोबरीत सुटली असली तरी एकप्रकारे भारताचा हा विजयच आहे कारण भारतीय संघ जेव्हा ही मालिका खेळण्यासाठी इंग्लंडच्या भूमीवर उतरला तेव्हा त्यांच्या स्वागताला कोणी हजर नव्हते. सराव सत्रालाही गर्दी नव्हती कारण सर्वांच्या मते इंग्लडच्या बलाढ्य आणि अनुभवी संघापुढे भारताचा युवा आणि अननुभवी संघ टिकणार नाही.

इंग्लडच्या अनेक दिग्गज माजी खेळाडू इंग्लड ही मालिका ४ – १ किंवा ५ – ० अशी जिंकेल असे छातीठोकपणे सांगत होते अर्थात त्याला कारणही तसेच होते रोहित शर्मा, विराट कोहली, रविचंद्रन अश्विन या भारताच्या माजी खेळाडूंनी निवृत्ती घेतली होती तर पुजारा, रहाणे, मोहम्मद शमी यासारख्या अनुभवी खेळाडूंना या मालिकेत वगळण्यात आले होते. बुमरा, के एल राहुल, जडेजा आणि पंत वगळता सर्वच खेळाडू नवखे होते. या मालिकेसाठी शुभमन गिल या युवा खेळाडूची निवड करण्यात आली होती. बुमरा आणि पंत हे जरी अनुभवी असले तरी ते पूर्ण पाच कसोटी खेळणार नव्हते त्यामुळे ही मालिका इंग्लंड सहज जिंकेल असा कयास लावला जात होता मात्र भारताच्या युवा खेळाडूंनी जबरदस्त कामगिरी करून हा कयास फोल ठरवला.

मालिकेच्या पहिल्या कसोटीतच भारताच्या खेळाडूंनी जबरदस्त कामगिरी करत इंग्लंडला इशारा दिला. वास्तविक पहिलीच कसोटी भारताने जिंकली असती पण मोक्याच्या क्षणी झेल सोडल्याने ही कसोटी इंग्लंडला जिंकता आली. दुसऱ्या कसोटीत मात्र भारताने पलटवार करत इंग्लडला तब्बल ३३६ धावांनी नामोहरण केले. तिसरी कसोटीही भारतानेच जिंकली


श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
मो.९९२२५४६२९५

असती मात्र नशीब बलवत्तर होते म्हणून इंग्लडला ही कसोटी अवघ्या २२ धावांनी जिंकता आली. चौथ्या कसोटीत मात्र दोन्ही संघाने तोडीस तोड कामगिरी केल्याने ती कसोटी अनिर्णित राहिली. पाचव्या कसोटीत पुन्हा भारताने जबरदस्त कामगिरी करत विजय मिळवला आणि मालिका बरोबरीत सोडवली. ज्या संघाचा मानहानीकारक पराभव होईल असा अंदाज होता त्याच संघाने मालिका बरोबरीत सोडवत इतिहास घडवला. भारतीय संघाच्या या ऐतिहासिक यशाचे जितके कौतुक करावे तितके कमी आहे.

भारताच्या युवा खेळाडूंकडे अनुभवाची कमतरता असली जिंकण्याचा विश्वास होता याच विश्वासाच्या बळावर भारताच्या या युवा संघाने ही कामगिरी केली. भारताच्या युवा खेळाडूंनी फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही आघाडीवर नेत्रदिपक कामगिरी केली. कर्णधार शुभमन गिल, के एल राहुल, यशस्वी जयस्वाल, ऋषभ पंत या खेळाडूंनी संपूर्ण मालिकेत धडाकेबाज फलंदाजी करून इंग्लंडची गोलंदाजी नेस्तनाबूत केली. कर्णधार शुभमन गिलने संपूर्ण मालिकेत सर्वाधिक ७५४ धावा काढून विक्रमी कामगिरी केली. तर के एल राहुलने ५३२ धावा काढल्या. ऋषभ पंत आणि यशस्वी जयस्वाल यांनी ४०० पेक्षा अधिक धावा काढल्या. भारताच्या या युवा फलंदाजांची ही कामगिरी हेवा वाटावी अशीच आहे. या खेळाडूंनी खोऱ्याने धावा काढल्याने मालिका बरोबरीत सोडवण्यास मोठी मदत झाली. गोलंदाजीतही भारतीय गोलंदाजांनी कमाल केली. बुमरा, सिराज आणि प्रसिद्ध कृष्णा, आकाश दीप या वेगवान गोलंदाजांनी कमाल करत इंग्लडच्या फलंदाजांचे कंबरडे मोडले. मोहम्मद सिराजने मालिकेत सर्वाधिक २३ बळी घेतले. बुमरा आणि प्रसिद्ध कृष्णा या तिघांनी ३ कसोटी खेळले आणि त्यांनी प्रत्येकी १४ बळी घेतले. तर आकाशदीपनेही ३ कसोटीत १३ बळी घेतले शिवाय शेवटच्या कसोटीत नाईट वाचमन म्हणून मोक्याच्या क्षणी अर्धशतक झळकावले. मोहम्मद सिराजने तर या मालिकेत अप्रतिम कामगिरी केली. रवींद्र जडेजाने या मालिकेत अष्टपैलू खेळ केला. रवींद्र जडेजाने या मालिकेत ५०० पेक्षा जास्त धावा काढल्या आणि मोक्याच्या क्षणी ७ बळी घेतले. एकूणच भारताच्या खेळाडूंनी फलंदाजी आणि गोलंदाजीत अप्रतिम कामगिरी केली. भारताचा नवा कर्णधार शुभमन गिलने संघाचे नेतृत्व कुशलतेने केले. कर्णधार म्हणून पहिलीच मालिका खेळत असतानाही तो कुठेही गांगरलेला वाटला नाही उलट मोक्याच्या क्षणी डोके शांत ठेवून व्यूहरचना रचत त्याने आपल्यातील नेतृत्वगुण दाखवून दिले. कर्णधारपदावर झालेली आपली निवड सार्थ ठरवत त्याने ही मालिका बरोबरीत सोडवली. कर्णधार असूनही त्याने आपल्या फलंदाजीवर परिणाम होऊ दिला नाही उलट कर्णधार झाल्यावर त्याची बॅट आणखी तळपली. त्याने या मालिकेत सर्वाधिक ७५४ धावा काढून कर्णधार म्हणून एका मालिकेत सर्वाधिक धावा काढण्याचा विक्रम केला. त्याने या मालिकेत ४ शतके झळकावली. तोच या मालिकेचा मालिकावीर ठरला एकूणच भारताच्या या युवा खेळाडूंनी जबरदस्त कामगिरी करून ही मालिका बरोबरीत सोडवली. भारताच्या या नव्या युवा संघाची ही कामगिरी कौतुकास्पदच नाही तर अभिमानास्पद आहे. इंग्लड विरुद्धची कसोटी मालिका बरोबरीत सोडवणाऱ्या भारतीय संघाचे मनापासून अभिनंदन!

**चक दे इंडिया!!**

## स्थगित...

सोडला बा निःश्वास
आंदोलन ते स्थगित
निर्णय का लांबवला
समजले नाही इंगित

संकट मोचक कोण
कुणास नाही माहीत
आश्वासन दे कोणते
झाले सगळे मोहीत

गुलदस्त्यात बंदिस्त
काय प्राप्त रे इप्सित
काय झाली जादूगरी
वेगळे मनो वांच्छित

लिंबू पाणी पाजायचे
सांस्कृतिक एक रीत
खरेपाणी कोण पाजे
चित्र विचीत्र विपरीत

घुसळले ताक सारखे
मुश्किले येते नवनीत
बोथट होतील हत्यारे
वापरून सारखे नीत

आरक्षण मिळवायचे
रे आप्तेष्ट मित्रासहीत
नोंदी मिळो ना मिळो
सरकार दरबार वहीत

लढतो आहेत लढाया
पहायचेसर्वांचेचं हीत
गांभीर्याने पहा आता
तोडूनटाक लालफीत

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

# खून पसीने की जो मिलेगी तो खायेंगे !

मागील आठवड्यात साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती संपूर्ण महाराष्ट्रभर, प्रत्येक गावात आणि शहरात मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांनी १९५९ साली ‘फकीरा’ ही अजरामर कादंबरी लिहिली. या कादंबरीला महाराष्ट्र शासनाचा १९६१ सालचा सर्वोत्कृष्ट कादंबरीचा किताब मिळाला. पुढे जाऊन याच कादंबरीवर आधारित चित्रपटही प्रदर्शित झाला.

‘फकीरा’ ही सत्यकथनावर आधारित कादंबरी आहे. फकीरा हा अण्णाभाऊंचा मामा होता. अण्णाभाऊंच्या जन्मकाळातच फकीरा हा वाटेगावच्या पंचक्रोशीत अजोड पराक्रम गाजवत होता. तो इंग्रजांविरुद्ध बंड करीत होता. दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाल्यावर इंग्रज सरकारने गोरगरिबांना कोणतीही मदत केली नाही. गावोगावी लोक उपासमारीमुळे मरू लागले; लहान मुलेही भुकेने तडफडू लागली.

त्यावेळी फकीराने हातात तलवार घेतली आणि धाडसी तरुणांचे संघटन उभारले. आपल्या सोबत या तरुणांना घेऊन त्याने बेडसगावचा इंग्रजी खजिना लुटला आणि त्या खजिनातील अन्नधान्य सर्व गावोगावी, सर्व जातीधर्मातील लोकांमध्ये वाटले. ‘रॉबिन हूड’ प्रमाणे श्रीमंतांना लुटून गरिबांना देणारा फकीरा एका दृष्टीने खलनायक वाटला, तरी कुणीही भुकेने तडफडून मरू नये हा त्याचा मानवतावादी दृष्टिकोन अधिक महत्त्वाचा होता.

या कादंबरीत फकिराचा सहकारी सावळाला इंग्रज प्रांताधिकारी खुनाच्या चौकशीसाठी बोलावतो. तेव्हा प्रांताधिकारी थेट आरोप करतो –तो खून तू केला आहे!

**यावर सावळा म्हणतो –**

कणसं खुडून पोट भरत, माणसं मारून भरत नाय माणसं जगावी, त्यांनी शेती पिकवावी, आणि आम्ही शेंडा–गोंडा आणून जगावं – असंच आम्हास्नी वाटतं

खरंच, जगण्याचा साधा–सोपा नियम ‘जिओ और जीने दो!’ फकिरामध्ये प्रत्ययास येतो. त्या काळात अस्पृश्य आणि भटक्या जातींना कोणतेही रोजगाराचे साधन नव्हते. त्यामुळे जगण्यासाठी अनेकांनी गुन्हेगारीचा मार्ग नाईलाजास्तव निवडला. चैनीसाठी किंवा विलासी जीवनासाठी नव्हे, तर फक्त पोटाची खळगी भरण्यासाठी त्यांनी हा खडतर मार्ग स्वीकारला.

आपल्या डोळ्यासमोर लेकरांचं तडफडून मरणं, म्हाताऱ्या कोताऱ्यांचं भाकरी–भाकरी करून टाचा खोडून मरणं उघड्या डोळ्यांनी पाहणं कोणत्याही तरुणाला असह्य झालं असतं. मग नाईलाजाने या तरुणांना दरोडे घालावे लागत होते.

ब्रिटिश काळात इ.स. १७९३ मध्ये रेग्युलेशन–२६ या अधिनियमाने बंडखोर मांग, रामोशी, बेरड, वडार, पारधी, भामटा, बहुरूपी, पेढारी, ठग इत्यादी जातींना ‘गुन्हेगारी जाती’ ठरवण्यात आले. पुढे याच कायद्याचे १८७१ मध्ये रूपांतर ‘गुन्हेगारी जमाती कायदा’ असे झाले. भारताच्या स्वातंत्र्यानंतरही १९५२ पर्यंत हा कायदा अस्तित्वात होता. ३१ ऑगस्ट १९५२ रोजी हा कायदा रद्द करण्यात आला आणि गुन्हेगार जाती–जमातींना तारेच्या कंपाऊंडमधून मुक्त करण्यात आले. मात्र, छत्रपती शाहू महाराजांनी १९१७ मध्येच आपल्या राज्यात हा कायदा वटहुकूमाद्वारे रद्द केला होता.

फकिराच्या काळात मात्र या कायद्याची अंमलबजावणी कठोरपणे होत होती.

भारतीय स्वातंत्र्यानंतर, विशेषतः घटनेच्या अंमलबजावणीनंतर देशात प्रचंड परिवर्तन झाले. सामाजिक न्याय या संकल्पनेला प्राधान्य देण्यात आले. सर्वांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या. भूकबळीचे प्रमाण कमी झाले. जो कष्ट करेल त्याला पोटभर अन्न मिळू लागलं.

याहूनही पुढे जाऊन, जो शिक्षण घेईल, परिश्रम करेल, बौद्धिक चातुर्य दाखवेल त्याला पद, प्रतिष्ठा आणि मान–सन्मान मिळू लागला. सुखसोयींनी युक्त असे जीवन जगण्याची संधी आता प्रत्येकाला आहे. तरीही आजच्या काळात काही लोक कमी कष्टात जास्तीत जास्त संपत्ती मिळवण्याचा मोह आवरू शकत नाहीत. ते अवैध मार्ग अवलंबतात. आजच्या भाषेत यालाच ‘हरामची कमाई’ म्हणतात.

कष्टाने आणि घाम गाळून, बौद्धिक क्षमतेचा उपयोग करून कमावलेले धन समाधान देते; पण भ्रष्ट मार्गाने मिळवलेली अफाट संपत्ती मनःशांती देत नाही. हरामचं खाणारे रोज रात्री झोपेसाठी गोळ्या खातात; तर झोपडीत राहणारे कष्टकरी चटणी–भाकरी खाऊन पडल्या पडल्या गाढ झोपी जातात.

रस्त्यावरून सायकलवर जोरजोरात ओरडून रद्दी–भंगार गोळा करणारा, हातगाड्यावरून भाजीपाला किंवा फळं विकणारा, उंच इमारतींवर बांधकाम करणारा, शेतात ऊन, वारा, पावसाची तमा न बाळगता राबणारा अशा असंख्य कष्टकऱ्यांना पाहिलं की कानात आपसूकच हे गीत घुमू लागतं –

खून पसीने की जो मिलेगी तो खायेंगे,
नहीं तो यारो हम भूखे ही सो जायेंगे!
दौलत हराम की न है ये किस काम की,
कहा लो कसम इसे हाथ न लगाएँगे!

ही ओळ फक्त श्रमपरिहार गीत नाही, तर कष्टकऱ्यांच्या जीवनतत्त्वज्ञानाचं गीत आहे.

हे गीत आपल्याला सांगतं –

कष्ट करा, प्रामाणिक राहा, घाम गाळाकारण खरं समाधान आणि खरं सुख हेच खऱ्या अर्थाने संपत्ती आहे!

**– किशोर जाधव, सोलापूर**
**– मो. नं. ९९२२८८२५४१**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

### शिरवळ जिमखान्याच्या नवीन वास्तु निर्मितीसाठी सहकार्य करू - उदय कबुले



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०५, खंडाळा (सातारा) :** शिरवळ येथे शालेय विद्यार्थ्यांसाठी बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. या स्पर्धेचे ४ थे वर्ष असून ४०० हुन आधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेचे बक्षिस वितरण कार्यक्रमात बोलतांना सातारा जि.प.माजी अध्यक्ष उदय कबुले म्हणाले शिरवळ जिमखान्याचे कार्य दिवसेंदिवस उत्तमरित्या चालू असून शिरवळ मधील व तालुक्यातील नवीन तरुणपिढी घडविण्याचे काम ते करीत आहेत. मदत व पुनर्वसन मंत्री नामदार मकरंद पाटील यांच्या माध्यमातून जिमखान्याच्या नवीन वास्तु निर्माण करण्यासाठी प्रयत्न करू असे ही त्यांनी यावेळी सांगितले. खंडाळा तालुका सरकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष राजेंद्र ताबे यांनी ही शिरवळ जिमखान्याच्या कामाबद्दल प्रशंसोद्गार काढत तालुका क्रीडा संकुलासाठीच्या मंजूर निधीतून जिमखाना इमारत बांधकामासाठी मंत्री मकरंद पाटील यांच्याकडून प्रयत्न करु असे सांगितले. कार्यक्रमात प्रास्ताविक करताना शिरवळ जिमखाना अध्यक्ष डॉ.विजय शिंदे यांनी जिमखान्याची वाटचालीबद्दल माहीती दिली. सूत्रसंचलन संदेश यादव व नितीन कोडे यांनी केले. बक्षीस वाचन चंद्रकांत भोईटे यानी केले. या स्पर्धेत एम.ई .एस.इंग्लिश स्कूल शिरवळने ७ बक्षीसे मिळवून प्रथम तर प्रत्येकी ३ बक्षिसे ज्ञानसंवर्धनी इंग्लिश मेडीयम स्कूल व ज्ञानसंवर्धनी माध्यमिक विद्यालय शिरवळ तसेच सेंट अनस व माऊंट कार्मेल इंग्लिश मेडीयम स्कूल लोणंद यांनी मिळवून द्वितीय क्रमांक मिळवला. या कार्यक्रमास जि.प.माजी सदस्या स्वातीताई बरदाडे, लोकनियुक्त सरपंच रविराज दुधगावकर, सदस्य संग्राम देशमुख,रूपालीताई गिरे, माजी सरपंच दशरथ निगडे, रफीक खान, गौरीधर गोजारी व इतर मान्यवर उपस्थित होते. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी सचिव प्रा.डॉ.गणेश भुतकर प्रभारी राजकुमार शहा, डॉ.हर्षवर्धन अंतुरकर, हर्ष जोशी, अजय चौगुले, प्रदीप साळुंखे व जिमखाना सदस्यांनी प्रयत्न केले.

## शालेय क्रीडा स्पर्धेत वय लपवण्यास चाप

### वयाची खात्री पटल्याशिवाय मैदानात उतरणे अशक्य




**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.०५, सोलापूर :** शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये वयाचा गैरवापर करणाऱ्या खेळाडूंना आळा घालण्यासाठी महाराष्ट्र शासनाने एक महत्त्वाचा आणि कठोर निर्णय घेतला आहे. यापुढे वयाची खात्रीशीर पडताळणी केल्याशिवाय कोणत्याही खेळाडूला स्पर्धेत भाग घेता येणार नाही. यामुळे, खोट्या वयाची कागदपत्रे सादर करून मोठ्या वयाचे खेळाडू लहान मुलांच्या गटात आता खेळू शकणार नाहीत.

क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने या संदर्भात एक परिपत्रक काढले आहे. विविध स्तरांवरील स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी खेळाडूंना वयाची अचूक पडताळणी करणे बंधनकारक असणार आहे. हा निर्णय शालेय क्रीडा क्षेत्रातील वाढत्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी उचललेले एक मोठे पाऊल आहे. अनेकदा खोट्या वयामुळे कमी वयाच्या आणि खरंच प्रतिभावान खेळाडूंना योग्य संधी मिळत नव्हती. परंतु, आता या नव्या नियमांमुळे स्पर्धा अधिक पारदर्शक होतील. त्यामुळे योग्य वयाच्या खेळाडूंना प्रोत्साहन मिळणार आहे.

#### गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी नियम

क्रीडा स्पर्धांमधील वयाच्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी शिक्षण विभागाने नवीन नियम लागू केले आहेत. किमान पाच वर्षे जुना असलेला शासकीय जन्मदाखला, पहिल्या इयत्तेतील जनरल रजिस्टर मधील नोंदीची सत्यप्रत. खेळाडूचे आधारकार्ड व यापुढे खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.

#### खेळाडूंच्या वयाची पडताळणी अनिवार्य

भारतीय शालेय खेळ महासंघाने सन २०२५-२६ पासून राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व खेळाडूंसाठी एज व्हेरिफिकेशन टेस्ट (वय पडताळणी चाचणी) अनिवार्य केली आहे. या निर्णयामुळे आता कोणत्याही खेळाडूला वयाची अचूक पडताळणी केल्याशिवाय राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये भाग घेता येणार नाही. खेळाडू, प्रशिक्षक आणि सर्व क्रीडा संस्थांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## आ.कोळीकर यांना कृषी दुकानदार, शेतकऱ्यांनी दिले निवेदन



**अक्षराज : लक्ष्मण शेन्नेवाड**

**दि.०५, हिमायतनगर (नांदेड) :** ईगल ९३०५ हे सोयाबीनचे बियाणे ह्यावर्षी मुबलक प्रमाणात पाऊस पडताना सुद्धा अनेक शेतकर्यांचे बियाणे उगवले नसल्याने शेतकरी व कृषी दुकानदार संघटना यांनी आमदार बाबुराव कदम कोळीकर यांना निवेदन दिले. दरवर्षी प्रमाणे ह्याही वर्षी शेतकर्यांनी ईगल ९५०३ हे बियाणे खरेदी करून आपल्या शेतात पेरले पण मुबलक पाऊस असताना सुद्धा बियाणे उगवले नसल्याने अनेक शेतकर्यांनी कृषी अधिकारी यांच्याकडे तक्रार केली.

अनेक वृत्तमान पत्रात वृत्त प्रकाशित झाल्यानंतर कंपनीच्या अधिकारी व कृषी अधिकार्यांनी शेतात जाऊन पिकाची पाहणी केली पण शेतकर्यांची कुठलीच दखल न घेतल्यामुळे मंगळवार, दि.०५ ऑगस्ट २०२५ रोजी कृषी दुकानदार संघटना व शेतकर्यांनी आमदार बाबुराव कदम कोळीकर यांची भेट घेऊन ईगल कंपनी विषयी तक्रारी अर्ज देऊन कार्यवाही करण्याची मागणी केली. यावेळी शिवसेना तालुका प्रमुख रामभाऊ ठाकरे कृषी दुकानदार संघटनेचे अध्यक्ष संदीप पळशीकर, मारोती लुम्दे पाटील, बाळु अण्णा चवरे, विजय शिंदे, ढगे, बाबुराव तिमापुरे, पंजाबराव मिराशे यासह असंख्य शेतकरी बांधव उपस्थित होते.

## आ. मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांमुळे प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या नोंदणीस मुदतवाढ

### शेतकऱ्यांना १४ ऑगस्ट २०२५ पर्यंत करता येणार अर्ज

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, चंद्रपूर :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांमुळे प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या नोंदणीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी या संदर्भात मुख्यमंत्र्यांकडे देखील ठोस मागणी केली होती. त्यांच्या प्रयत्नांना अखेर यश आलं आहे. विशेष म्हणजे शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यात आ. मुनगंटीवार यांच्या तत्परतेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप २०२५ साठी नोंदणी करण्याची अंतिम मुदत पूर्वी ३१ जुलै २०२५ होती. मात्र, चंद्रपूर जिल्ह्यात मागील दोन आठवड्यांत झालेल्या मुसळधार पावसामुळे आणि काही भागांतील नेटवर्कच्या अडचणीमुळे अनेक शेतकऱ्यांना वेळेत नोंदणी करता आली नव्हती.

त्यामुळे जिल्ह्यात केवळ ४८,५०० शेतकऱ्यांनीच नोंदणी केली असून, मागील वर्षी याच योजनेअंतर्गत सुमारे



साडेतीन लाख शेतकऱ्यांनी नोंदणी केली होती. ही तफावत लक्षात घेऊन आणि शेतकऱ्यांना पीक विम्याच्या लाभापासून वंचित राहावे लागू नये म्हणून आ. सुधीर मुनगंटीवार यांनी नोंदणीची मुदत वाढविण्याची मागणी राज्याचे मुख्यमंत्री आणि कृषीमंत्र्यांकडे केली होती.

या मागणीला तात्काळ प्रतिसाद देत शासनाने प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप २०२५ साठी नोंदणीची अंतिम मुदत १४ ऑगस्ट २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे. त्यामुळे अद्याप नोंदणी न केलेल्या शेतकऱ्यांनी लवकरात लवकर जवळच्या सेवा केंद्रावर किंवा अधिकृत ऑनलाईन पोर्टलवर जाऊन नोंदणी करावी, असे आवाहन देखील आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केले आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांनी आ.सुधीर मुनगंटीवार यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

## 'त्या' १४ गावांचे सीमांकन तात्काळ पुर्ण करुन महाराष्ट्रात समावेश करा

### खा.धानोरकर यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाची केंद्रीय मंत्री यादव यांची भेट



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती तालुक्यातील महाराष्ट्र-तेलंगणी सीमेवरील १४ गावांच्या सीमांकन आणि भूमी अभिलेखाचा अनेक दशकांपासून प्रलंबित असलेला प्रश्न अखेर मार्गी लागण्याची चिन्हे दिसत आहेत. खासदार प्रतिभा धानोरकर यांनी दिनांक ०४ ऑगस्ट २०२५ रोजी दिल्ली येथे केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांची भेट घेऊन या गंभीर विषयावर चर्चा केली. १९९७ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्राच्या बाजूने निकाल दिला असला तरी या गावांची अधिकृत सीमांकन प्रकिया अजून ही पूर्ण झाली नाही, हे त्यांनी मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. त्यांनी केंद्र आणि राज्य सरकारला समन्वय साधीन यावर तातडीने उपाययोजना करण्याची विनंती केली. या भेटीत, मंत्र्यांनी यावर लवकरच सकारात्मक तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. यामुळे या गावांच्या विकासाचा आणि गावकऱ्यांच्या हक्कांचा मार्ग मोकळा होणार आहे.

यावेळी खा. प्रतिभा धानोरकर यांनी जिवती तालुक्यातील ८६४९.८०९ हेक्टर क्षेत्राला वादग्रस्त वनक्षेत्रातून वगळण्याची मागणी केली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून चुकीच्या नोंदीमुळे वनक्षेत्र म्हणून गणल्या गेलेल्या या जमिनींमुळे शेतकरी आणि स्थानिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. या संदर्भात, उपवनसंरक्षक आणि तहसीलदारांच्या संयुक्त अहवालानुसार हे क्षेत्र वनक्षेत्र नसल्याचे सिध्द झाले आहे. तरीही हा प्रस्ताव अद्याप प्रलंबित आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असून, त्यांना शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी अडचणी येत आहे.

तसेच यावेळी १४ गावांच्या प्रश्न तसेच वनजमिनी प्रश्न संदर्भातील अडचणी केंद्र सरकारच्या स्तरावरच सोडविल्या जाऊ शकत असल्यामुळे केंद्राने या प्रश्नांमध्ये हस्तक्षेप करुन ते तात्काळ निकाली लावण्याची आग्रहाची विनंती खासदार प्रतिभा धानोरकर यांनी केली. याप्रसंगी मंत्री महोदयांनी दोन्ही गंभीर विषयावर लवकरच तोडगा काढण्याचे आश्वासन दिले आहे. या बैठकीत जिवती येथील कॉंग्रेस नेते सुग्रीव गोतावळे, तिरुपती पोले, सिताराम मडावी, दत्ता गायकवाड, चंद्रकांत बिऱ्हाडे आणि बंडू राठोड यांचीही उपस्थिती होती. खा. प्रतिभा धानोरकर यांच्या या प्रयत्नांमुळे दोन्ही प्रश्नांवर लवकरच सकारात्मक तोडगा निघेल, अशी आशा व्यक्त केली.

## वाईत श्रावणधारा संमेलनात कवितांच्या सरी बरसल्या



**अक्षराज दिलीप कांबळे**

**दि.०५, वाई (सातारा) :** महाराष्ट्र राज्य साहित्य परिषद शाखा वाईच्या वतीने काव्य संमेलन सन फार्म ऍग्रो टुरिझम पसरणीच्या निसर्ग रम्य वास्तूमध्ये मोठ्या उत्साही व आनंदी वातावरणात संपन्न झाले. अध्यक्षस्थानी प्रसिद्ध युवा साहित्य निलेश महिगावकर होते. प्रमुख पाहुणे प्रतापराव देशमुख व भाई भिलारे ही अभ्यासू व्यक्तिमत्त्व लाभले होते. काव्य संमेलनात २५ कवींनी सहभाग घेऊन आपला कलाविष्कार सादर केला.

सुरुवातीला पावसाची पहिली कविता दीपक चिकणे यांनी सादर केली. आषाढी पाऊस पीक पाणी नदी नाले ओढ शिवार पर्वत दर्या धुके मेघ सामाजिक धार्मिक राजकीय वैचारिक प्रेम अविष्कार कविता सादर होऊन विविधनांच्या रंगांची उधळण संमेलन झाले. माझा कोंबडा, नारळ मदिराचे महत्व वर्णन करून कवी विलास पिसाळ यांनी वाहवा मिळवली.

प्रताप महांगडे यांनी निष्ठावंत आमदार व विषामृत या दोन कवितेतून राजकीय विषय समाजाचे पतन सामान्य नागरिकांचे हाल मांडून सर्वांना अंतर्मुख केले. सुजाता घोरपडे यांनी आई नावाच्या कवितेतून आई विषयी कृतज्ञता व्यक्त करताना उपस्थितांना भावुक बनवले तर वसंत देशमाने यांनी दोन गजला सादर करून तिचं कधी चुकत नसतं या गझलेला समाजापर्यंत गेल्या नसल्याची खंत श्रोत्यांना लागून राहिली कवी ढवण यांनी सुगंधी केवढा कविता सादर करून सुगंध पसरवत ऐतबार नावाची हिंदी कविता सादर करून संमेलना त रंगत आणली.

ज्ञानेश सूर्यवंशी यांनी समाज विसंगत्वर गझल सादर केली. क्रांती पाटील यांनी चहा कविता सादर केली. अजित क्षीरसागर यांनी पाऊस ग्लास सखीचा घट का बर कविता सादर करून मोगऱ्याच्या सात कळ्या ही अभिनव कविता साजरी केली. गणेश गरड यांनी आई मला मूल व्हायचं मी भावात्मक कविता सादर करून भाव जागृती निर्माण केली. गणेश खरात यांनी माणसासारखे कर्म करायचे या कवितेतून प्राणी सुद्धा मानवी वर्तनावर नाराज आहेत. संभाजी लावंड यांनी बाई खेळण्यात रंग आणि जी बघावं ती नियर या दोन कविता सादर केल्या विजय मुळीक यांनी नशीब कविता सादर केली तर निलेश महेगावकर यांनी अर्थ नावाची कविता सादर करून जीवनाचा अर्थ स्पष्ट केला. शेवटी संतोष गेडाम मीना कुलकर्णी विशाल कानडे यांनी आपल्या आवडत्या व लोकप्रिय कविता सादर करून टाळ्या मिळवल्या पुढील कवी संमेलन वामन पंडित यांच्या समाधी स्थळे व्हावे. अशी मागणी करून कवी संमेलनाची सांगता झाली.

## कल्याण-डोंबिवलीच्या विकासाला ग्रहण लावणारा 'चाँदभाई' कोण?

### भाजप - शिंदे गटाच्या कारभारावरून मनसेचा सवाल

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०४, डोंबिवली (ठाणे) :** भाजपचे प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांनी कल्याणमध्ये रविवारी झालेल्या कार्यकर्ता मेळाव्यात शिंदे गटाविरोधात अप्रत्यक्ष खदखद व्यक्त केली होती. कल्याण - डोंबिवलीच्या विकासाला ग्रहण लागल्याची कबुलीच त्यांनी दिली होती. हा धागा पकडत मनसेचे माजी आमदार राजू पाटील यांनी भाजप-शिंदे गटाच्या कारभारावर ताशेरे ओढले आहेत.

डोंबिवलीच्या विकासाला ग्रहण लावणारा 'चाँदभाई' कोण? असा सवाल ट्विटच्या माध्यमातून त्यांनी केला आहे. शिंदे गटाच्या पापात सहभागी व्हायचे नसेल तर डोंबिवलीच्या विकासाला ग्रहण लावणारा 'चाँदभाई' कोण? त्यांचे नाव घ्या, असे आव्हानच राजू पाटील यांनी रवींद्र चव्हाण यांना



दिले आहे.

कल्याण-डोंबिवलीच्या विकासाला लागलेले ग्रहण सोडवायचे असेल तर केडीएमसीत भाजपचा महापौर हवा, असे आवाहन रवींद्र चव्हाण यांनी कार्यकर्त्यांना केले होते. हाच धागा पकडून राजू पाटील यांनी भाजपला डिवचले आहे. आपण महापालिकेत



३० वर्षे सत्तेत सहभागी आहात. त्यामुळे शिंदे गटाच्या पापात सहभागी व्हायचे नसेल तर विकासाला ग्रहण लावणारा 'चाँदभाई' कोण आहे? त्यांचे नाव घ्या. अन्यथा तुम्हीही त्या पापात सहभागी आहात असे आम्ही समजू. जर पापात भागीदार व्हायचे नसेल तर थेट बोला, असे म्हणत राजू पाटील यांनी रवींद्र चव्हाण यांचा चिमटा काढला. आमचा सल्ला पटला तर घ्या अन्यथा तो पलावा पुलाच्या खड्यात टाकून द्या, अशी फिरकीही राजू पाटील यांनी रवींद्र चव्हाण यांची घेतली आहे.

लोकार्पण झालेल्या पलावा पुलाला केवळ ३० दिवसांत खड्डे पडले. शिंदे अँण्ड सन्स कंपनीने यापूर्वीही डोंबिवलीकरांच्या भावनांशी, पैशांशी खेळ केला आहे, अशी घणाघाती टीका राजू पाटील यांनी केली. भ्रष्ट ठेकेदार, अधिकारी व नेत्यांची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी त्यांनी केली. पलावा पुलासाठी जनतेचे कोट्यवधी रुपये खर्च झाले. पण त्या पैशातून प्रत्यक्ष फायदा कोणाला झाला. पुलाची गुणवत्ता कुठे हरवली, कामाचे ऑडिट होणार की नाही, जबाबदार ठेकेदारांवर कारवाई होणार की नाही, या सगळ्या प्रश्नांची उत्तरे जनतेला हवी आहेत आणि ती तुम्हालाच द्यावी लागतील, असेही राजू पाटील यांनी भाजपला ठणकावले आहे.

# रोगराईने मृत झालेल्या हजारो कोंबड्या बोंद्री गावच्या रस्त्यावर

## सतर्क तरुणांनी कंपनीचा डाव हाणून पाडला

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०५, पाटण (सातारा) :** बोंद्री - पिंपळोशी या दोन्ही ग्रामपंचायतीच्या हद्दीत कार्यरत असणाऱ्या वेंकीज इंडिया लिमिटेड या कंपनीचा मघरोरीपणा आता रस्त्यावर आला असून कंपनीतील रोगराईने मृत झालेल्या हजारो कोंबड्या गावच्या मुख्य रस्त्याच्या कडेला टाकण्याचा प्रकार रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास तरुणांनी उघडकीस आणला. यामुळे गावकऱ्यांच्या जीवाशी खेळणाऱ्या या कंपनीवर गुन्हा दाखल करुन कंपनीला हद्दपार करण्याची मागणी दोन्ही ग्रामपंचायतीच्या ग्रामस्थांनी सुरू केली आहे.

बॉयलर कोंबडीवर प्रक्रिया करणाऱ्या या कंपनीतील हजारो कोंबड्या साथीच्या रोगाने मृत झाल्या असल्याचा प्रकार कंपनीत घडला. दिनांक ०३ ऑगस्ट २०२५ रोजी मध्यरात्रीच्या वेळी मृत झालेल्या कोंबड्या बोंद्री गावच्या मुख्य रस्त्याच्या कडेला टाकण्याचा प्रकार कंपनीतील कर्मचाऱ्यांकडून सुरू होता. पीपीईकिट घालून, तोंडाला मास्क लावून कंपनीचे कर्मचारी कोंबड्या रस्त्याच्या कडेला फेकत होते. बोंद्री गावातील जागरूक तरुणांना हा प्रकार समजताच त्यांनी कंपनीच्या कर्मचाऱ्यांचा हा प्रकार हाणून पाडला. यावेळी कंपनीच्या कर्मचाऱ्यांना याचा जाब तरुणांनी विचारला असता कंपनीचे कर्मचारी निरुत्तर झाले. या बाबत त्यांना काहीच सांगता आले नाही. कंपनीच्या कर्मचाऱ्यांना तरुणांनी खडसावले



असता त्यांनी टाकून दिलेल्या कोंबड्या तेथून उचलल्या मात्र रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणात कोंबड्यांची झालेली घाण यामुळे सगळीकडे दुर्गंधी पसरली रात्री उशिरा तरुणांच्या रेट्यापुढे रस्ता साफ करण्याचा प्रयत्न कर्मचाऱ्यांनी केला पण कोंबड्यांची विष्ठा, रक्त, अवयव, दुर्गंधी सगळीकडे पसरल्यामुळे याठिकाणी रात्री उशिरा जंगली वन्य प्राण्यांचे आगमन झाल्याचे येथील त्यांच्या पायाच्या ठस्या वरुन दुसऱ्या दिवशी समोर आले. रोगराईमुळे मृत झालेल्या कोंबड्यांची दुर्गंधी व वन्य प्राण्यांचा वाढलेल्या वावर यामुळे वेंकीज इंडिया लिमिटेड कंपनी ग्रामस्थांच्या जिवाशी खेळ करत असल्याचे धक्कादायक सत्य रविवारी रात्री समोर आले आहे. कंपनीच्या अशा कृतीमुळे गावकऱ्यांनी संताप व्यक्त केला आहे.

सुमारे १०-१२ वर्षांपूर्वी वेंकीज इंडिया लिमिटेड नावाची कंपनी पाटण तालुक्याच्या बोंद्री, पिंपळोशी या गावच्या हद्दीत शेकडो एकरच्या परिसरात कार्यरत आहे. या कंपनीत मोठ्या प्रमाणात बॉयलर कोंबड्यांची पिल्ले उत्पादीत करून कोंबडीवर प्रक्रिया केली जाते. या कंपनीच्या कंपाऊंड आणि प्रवेशद्वारा जवळ जाण्यास सामान्य नागरिकांना कडक निर्बंध आहेत. कंपनी कर्मचारी किंवा कंपनी संबंधित व्यक्तीशिवाय इतर कोणालाही आत सोडले जात नाही. यामुळे कंपनीतील आतील कामकाजाबाबत फारशी माहिती स्थानिक नागरिकांना उपलब्ध नाही.

दिनांक ०३ ऑगस्ट २०२५ च्या मध्यरात्री कंपनीकडून घडलेल्या या प्रकाराबाबत बोंद्री, पिंपळोशी गावचे नागरिक संतापले आहेत. कंपनीचे कर्मचारी मृत कोंबड्या फेकून देताना पीपीई किट, तोंडाला मास्क घालून स्वतः ची ऐवढी काळजी घेत असतील तर हा प्रकार किती भयावह आहे हे समोर येते. कंपनीच्या अशा प्रकारांमुळे बोंद्री, पिंपळोशी गावांसह परिसरातील अनेक गावांत रोगराई पसरण्याची दाट शक्यता आहे. याचा वेळीच इलाज करण्यात यावा कंपनीच्या अशा प्रवृत्तीवर गुन्हा दाखल करुन कंपनीचं हद्दपार करावी अशी मागणी ग्रामस्थ करु लागले आहेत.

# ठाण्यातील वाहतूक कोंडी तात्काळ दुर करण्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांचे निर्देश

**अक्षराज : संजय पंडीत**

**दि.०५, ठाणे :** ठाणे आणि परिसरातील वाहतूक कोंडीमुळे नागरिक अतिशय त्रस्त झाले आहेत. सर्व यंत्रणांनी समन्वय साधून हा परिसर वाहतूक कोंडी मुक्त करावा. तसेच रस्ते तातडीने दुरुस्त करून खड्डे मुक्तीसाठी उपलब्ध असलेले उत्तम तंत्रज्ञान वापरावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवार, ०५ ऑगस्ट २०२५ रोजी दिले. सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यात येत असलेल्या अपयशाबद्दल स्पष्ट शब्दात नाराजी व्यक्त केली.

ठाण्यात कोपरी, माजिवडा यासोबत घोडबंदर रस्ता, गायमुख घाट ते फाउंटन हॉटेल, शिळफाटा परिसर येथे सकाळी आणि संध्याकाळी गर्दीच्या



वेळी होत असलेल्या वाहतूक कोंडीमुळे नागरिक प्रचंड त्रस्त झाले आहेत. त्याबद्दलच्या तक्रारी वारंवार येत असून सर्व यंत्रणांनी समन्वय साधून हा पूर्ण परिसर वाहतूक कोंडी मुक्त करावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी झालेल्या बैठकीत दिले. या बैठकीस ठाण्याचे जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्णनाथ पांचाळ, ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव, पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, वाहतूक पोलीस उपायुक्त पंकज शिरसाट आदी अधिकारी उपस्थित होते.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता सिद्धार्थ तांबे यांना दूरध्वनीद्वारे सूचना दिल्या. गायमुख घाटातील रस्त्यामुळे वाहतूक कोंडी सातत्याने होत असून या समस्येवर अजूनही तोडगा काढण्यात यश आलेले नाही. याबद्दल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नाराजी व्यक्त केली.

त्याचबरोबर, वाहतुकीचे व्यवस्थित नियोजन करून ठाणे, भिवंडी, शिळफाटा आणि कोपरी या चारही भागातील वाहतूक कोंडीवर मात करावी. रस्ते दुरुस्ती करताना त्या कामाचा दर्जा चांगला असावा. रस्त्यावर दुरुस्तीचे उंचवटे तयार होऊ नयेत. त्याने अपघात होतात, याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे. खड्डे मुक्ती झाल्यास वाहतूक सुरळीत होण्यास मदत होईल. त्यामुळे उपलब्ध असलेले उत्तम तंत्रज्ञान वापरून खड्डे मुक्ती करावी, असेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी स्पष्ट केले.

तसेच महाराष्ट्रातील ठाणे शहरासाठी सहा वर्षांपूर्वी तयार करण्यात आलेला वाहतूक स्वरूप पुन्हा परिभाषित केला जाईल. २०१८ मध्ये तयार करण्यात आलेला आराखडा आता सध्याच्या वाहतूक परिस्थितीसाठी योग्य नाही. तेव्हापासून शहरातील वाहतूक परिस्थितीत मोठा बदल झाला आहे. हे लक्षात घेता, वाहतूक स्वरूप बदलून त्याची पुनर्परिभाषा केली जाईल. २०३० मध्ये होणारी वाहतूक परिस्थिती लक्षात घेऊन हा बदल केला जाईल, हे काम मुंबई आयआयटीकडून केले जाईल.

# मंडल यात्रेचे चंद्रपूर शहरात उत्साहात स्वागत

## सामाजिक न्यायासाठी, ओबीसींच्या हक्कासाठी मंडल यात्रा एक प्रभावी आवाज बनली आहे : प्रा.डहाके

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०३, चंद्रपूर :** जातीनिहाय जनगणनेसाठी जनजागृती करणारी 'मंडल यात्रेचे' दिनांक ०३ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता वरोरा नाका, चंद्रपूर येथे विविध सामाजिक संघटना व राजकीय पक्ष यांच्या तर्फे भव्य स्वागत स्वागत करण्यात आले. मंडल आयोग लागू होऊन ७ ऑगस्ट १९९० रोजी ओबीसी समाजाला मिळालेल्या घटनात्मक आरक्षणाच्या स्मरणार्थ ही यात्रा दरवर्षी काढली जाते.

ओबीसी, भटके-विमुक्त, एसबीसी समाजाच्या हक्कासाठी ही यात्रा एक प्रभावी आवाज बनली आहे. मंडल यात्रेचे संयोजक उमेश कोराम व ओबीसी सेवा संघाचे जिल्हा अध्यक्ष प्रा. अनिल डहाके यांच्या नेतृत्वात निघालेल्या मंडल यात्रेचे चंद्रपूर शहरातील विविध प्रमुख चौकांमध्ये नागरिक, विद्यार्थी, कार्यकर्ते आणि ओबीसी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मंडल यात्रेचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. मंडल आयोग आणि सामाजिक न्यायाचा विचार जागवणारी ही यात्रा, शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय मागण्यांसह जनजागृती करत पुढे पुढे जात आहे.

या यात्रेत उमेश कोराम, प्रा.अनिल डहाके, कृतल आखरे, आकाश वैद्य, मठलकर यांचे स्वागत ओबीसी सेवा संघाचे जिल्हा महासचिव ॲड. विलास माथनकर, मंडल यात्रेचे स्वागत अध्यक्ष संजय ढवस, चंद्रपूर काँग्रेस पार्टीचे शहर अध्यक्ष रामू तिवारी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष नितिन भटारकर, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे शहर अध्यक्ष बेबीताई उईके, आप चे जिल्हाध्यक्ष मयूर राईकवार, रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष बाळुभाऊ खोब्रागडे, जन विकास सेनेचे अध्यक्ष पप्पू देशमुख, ख्रिस्ती विकास समितीचे अध्यक्ष विजय नळे, भारतीय जनता पक्षाचे रणजित डवरे, माजी नगर सेवक नंदू नागरकर, वंचित बहुजन महिला



सामजिक न्यायासाठी, ओबीसींच्या हक्कासाठी मंडल यात्रा एक प्रभावी आवाज बनली आहे. जोपर्यंत ओबीसींची जनगणना होत नाही आणि डेटा सार्वजनिक होऊन ओबीसींच्या लोकसंखेच्या प्रमाणात ओबीसींना बजट मिळून त्याची अंमलबजावणी होत नाही तोपर्यंत मंडल यात्रा सातत्याने सुरू राहील.

**- प्रा.अनिल डहाके (जिल्हाध्यक्ष, ओबीसी सेवा संघ, चंद्रपूर)**

आघाडीचे अध्यक्ष तनुजाताई रायपूरे, भीम आर्मी चे जिल्हा अध्यक्ष सुरेंद्र रायपूरे, माळी समाजाचे अध्यक्ष राजू बनकर, धनोजे कुणबी समाज मंडळाचे सचिव अतुल देऊळकर, तेली समाजाचे प्रतिनिधि मिनाक्षी गुजरकर व बामसेफचे प्रतिनिधी व विविध सामाजिक संघटना, राजकीय पक्षाचे नेते, प्रतिनिधि यांनी यांनी विविध चौकात उपस्थित राहून जल्लोषात स्वागत केले. मंडल यात्रा यशस्वी करण्यासाठी हिराचंद बोरकुटे, भाविक येरगुडे, भास्कर सपाट, खुशाल काळे, प्रलय म्हशाखेत्री, प्रा.सुरेश विधाते, विपिन देऊळकर, अवधूत कोठेवार यांनी परिश्रम घेतले.

# रुग्णसेवा मदत कक्षाचा उद्घाटन सोहळा संपन्न

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०४, मिरा भाईंदर :** मिरा-भाईंदर शहरामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व सहयोग आरोग्य मंडळ फाउंडेशनच्या मार्फत '२४÷७ रुग्णसेवा मदत कक्ष' सुरूकरण्यात आला आहे. याचबरोबर ८८५०२३०७४८ हा हेल्पलाईन क्रमांक देण्यात आला आहे. आरोग्य सेवेसाठी समर्पित हेल्पलाइन व कार्यालयाचा शुभारंभ दिनांक ०४ ऑगस्ट



२०२५ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रमोद कांबळे यांच्या हस्ते करण्यात आला. रुग्णसेवा हीच खऱ्या अर्थाने लोकसेवा असल्याचे कांबळे यांनी सांगितले. जनसेवेच्या कार्यात अग्रेसर असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मिरा-भाईंदर शहर जिल्ह्याच्यावतीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रेरणेतून आणि खासदार सुनीलजी तटकरे तसेच माजी खासदार आनंदजी परांजपे (प्रदेश सरचिटणीस व ठाणे-पालघर जिल्हा समन्वयक) यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णसेवा मदत कक्ष मिरा-भाईंदर शहरात कार्यरत करण्यात आला आहे.

# थोडक्यात

## वैष्णवी पाटील हिची जागतिक अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेसाठी जाणाऱ्या भारतीय संघात निवड

**अक्षराज : विनोद वास्कर**



**दि.०५, कल्याण (ठाणे) :** कल्याणची कुस्तीपटू वैष्णवी पाटील ही जय बजरंग तालीम, नांदिवली, कल्याण येथे कुस्तीचे धडे घेते. ती ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ तालुक्यातील मांगरूळ गावची रहिवासी आहे. वैष्णवीने पुढील महिन्यात झाग्रेब येथे होणाऱ्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेसाठी महिलांच्या ६५ किलो वजनी गटात राष्ट्रीय संघात आपले स्थान निश्चित केले आहे.

त्यासाठी तिने आपल्या प्रतिस्पर्धकांना एकामागून एक चितपट केले आहे. झाग्रेब येथे १३ ते २१ सप्टेंबर रोजी या स्पर्धा होणार आहेत. वैष्णवीने निवड चाचणीत ६५ किलो वजनी गटात यश मिळवून ही संधी मिळवली आहे.

## प्रत्येक मेट्रो स्थानकाखाली असणार राखीव प्रवासी थांबा



**अक्षराज : तानाजी ताकतोडे**

**दि.०५, ठाणे :** कापुरबावडी ते घोडबंदर मार्गावरील ८ मेट्रो स्थानकाच्या खाली स्वतंत्र प्रवासी थांबे निर्माण करावेत. जेणेकरून प्रवाशांना मेट्रो मधून उतरल्यानंतर पूरक वाहतूक व्यवस्था निर्माण होईल, अशा सूचना मेट्रोच्या अधिकाऱ्यांना दिल्या. गायमुख ते माजिवडा, घोडबंदर रोड येथे सुरू असलेल्या मेट्रो, रस्ते, पूल व फूट ओव्हर ब्रीज या विकास कामांची पाहणी करून आढावा घेतला. ५-६ वर्षांपूर्वी ठाणे मेट्रोचे काम सुरू झाले तेव्हा सेवा मार्ग हा मुख्य रस्त्याच्या बाजूला होता. परंतु घोडबंदर मार्गावरील वाढती वाहतूक कोंडी लक्षात घेता, तत्कालीन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना विनंती केली की, सध्याचा सेवा मार्ग हा मुख्य रस्त्यामध्ये विलीन करावा जेणेकरून घोडबंदर रस्त्यावरील वाहतूक कोंडीचा प्रश्न मिटू शकेल.त्या अनुषंगाने ६०० कोटी रुपये अतिरिक्त निधी यासाठी उपलब्ध करून देण्यात आला. तथापि सेवा मार्ग व मुख्य रस्ता याच्या मधोमध मेट्रोचे स्थानकाचे जिने उतरत असल्यामुळे ते भविष्यात प्रवाशांना धोकादायक ठरू शकतील, अशा तक्रारी नागरिकांकडून येऊ लागल्या.

संदर्भात प्रत्यक्ष पाहणी करून तोडगा काढण्यासाठी या दौऱ्याचे नियोजन केले होते. सध्या सेवा मार्ग मुख्य रस्त्याशी जोडला जात असल्यामुळे रस्त्याची रुंदी वाढलेली आहे. परंतु जिथे मेट्रो स्थानक आहे, तेथे प्रवासी उतरण्याच्या जिन्यालगत प्रवाशांना पूरक वाहतूक व्यवस्था निर्माण करणे गरजेचे असल्यामुळे सदर सेवा मार्ग हा त्या प्रवाशांसाठी स्वतंत्र थांबा म्हणून विकसित करावा अशी मागणी पुढे आली. त्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले आहेत की, त्यांनी प्रत्येक मेट्रो स्थानकाच्या खाली सेवा मार्ग आरक्षित करून तेथे प्रवाशांना पूरक वाहतूक व्यवस्था निर्माण करावी जेणेकरून एसटी बस, शहर बस आणि रिक्षा व टॅक्सी या वाहनाखेरीज इतर वाहने या मार्गावरून येऊ नयेत. अशा प्रकारचे सूचनाफलक मुख्य रस्त्याच्या बाजूला लावण्यात यावेत, अशा सूचना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी ठाणे महापालिका, मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण, वाहतूक विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## शासन सर्वसामान्य जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी खंबीर - सतीश साळवे

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.०५, बल्लारपूर (चंद्रपूर) :** बल्लारपूर तहसील कार्यालय मार्फत महसूल सप्ताह साजरा केला जात आहे. या अनुषंगाने छत्रपती शिवाजी महाराज महास्वराज्य समाधान शिबीर होत आहे. शिबिराच्या माध्यमातून जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न केला जात आहे. यामुळे लोकाभिमुख योजनांची माहिती मिळत आहे. याचा लाभ वंचित घटकांना होत आहे. महसूल प्रशासन सर्वसामान्य जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी खंबीर आहे, असे प्रतिपादन बल्लारपूर येथील नायब तहसिलदार सतीश साळवे यांनी सोमवार, दिनांक ०४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ वाजता विसापूर येथे केले. बल्लारपूर तहसील कार्यालयाच्या वतीने १ ते ७ ऑगस्ट दरम्यान महसूल सप्ताह साजरा केला जात आहे. या मालिकेत विसापूर मंडळ स्तरावर स्थानिक ग्रामपंचायत सभागृहात छत्रपती शिवाजी महाराज महास्वराज समाधान शिबीर आयोजित करण्यात आले. यावेळी शिबिराचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी उपसरपंच अनेकश्वर मेश्राम होते. तर प्रमुख अतिथी म्हणून नायब तहसीलदार सतीश साळवे, महसूल अधिकारी दिपक वढुले, मंडळ अधिकारी किशोर नवले, सहाय्यक महसूल अधिकारी सोनु गावंडे, ग्राम महसूल अधिकारी आरती दुलत, ए.एन.नौकरकर, दिपक निंबाळकर यांची उपस्थिती होती.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला मान्यवरांनी मालार्पण करून अभिवादन केले. दरम्यान संजय गांधी निराधार योजना, विद्यार्थ्यांना लागणारे शालेय दाखले, शेतकऱ्यांना सातबारा उतारा, सामाजिक योजना, विविध प्रकारचे प्रमाणपत्र प्रदान करून लोकाभिमुख, कार्यक्षम व गतीमान प्रशासनाचे महत्व जनतेच्या लक्षात आणून दिले. दिपक वढुले यांनी ऑनलाईन प्रक्रियेची माहिती दिली. प्रास्ताविक उपसरपंच अनेकश्वर मेश्राम यांनी केले. संचालन व आभार प्रदर्शन संतोष निपुंगे यांनी केले. यावेळी शेतकरी, विद्यार्थी व नागरिकांची उपस्थिती होती.